सोलापूर
तरुण भारत
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, ४ फेब्रुवारी २०२६

# सदाफुली

आतील पानावर
पान २– दिव्याला हवाय समजून घेणारा जोडीदार
पान ३– इमरानने अशी बदलली त्याची इमेज
पान ४– मला ग्लॅमरसाठी नाही तर...
पान ५– हाऊस फादरच्या भूमिकेत सिद्धार्थ चांदेकर
पान ६– पत्नीने पतीवर आवाज चढवला पाहिजे!



# 'सीता रामम'च्या दुसऱ्या भागात मृणाल?

२०२२ साली एक असा सिनेमा आला ज्या सिनेमाने प्रेक्षकांच्या हृदयाचा ठाव घेतला. सिनेमाची भावस्पर्शी कथा प्रेक्षकांना चांगलीच आवडली. या सिनेमात एका साऊथ सुपरस्टारने काम केलं. याशिवाय एक मराठी अभिनेत्री यात झळकली. आता ४ वर्षांनी या सिनेमाचा पुढील भाग प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या दोनही प्रमुख कलाकारांनी त्यांचा एक खास फोटो सोशल मीडियावर पोस्ट केलाय. ज्या सिनेमाचा दुसरा भाग येईल अशी चर्चा आहे त्याचं नाव आहे 'सीता रामम'. 'सीता रामम' हा सिनेमा २०२२ साली आला होता. या सिनेमात दुलकर सलमान आणि मृणाल ठाकूर या कलाकारांनी प्रमुख भूमिका साकारली होती. दुलकर आणि मृणालचा एक खास फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. या फोटोत दोघेही एका छत्रीत असून एकमेकांकडे प्रेमाने बघत आहेत. या फोटोमध्ये दोघेही एकमेकांसोबत हसताना आणि गप्पा मारताना दिसत आहेत. या जोडीला पुन्हा एकदा फ्रेममध्ये एकत्र पाहून चाहत्यांना त्यांच्या आवडत्या 'राम' आणि 'सीता'ची आठवण झाली. हा फोटो व्हायरल होताच कमेंट्सचा वर्षाव सुरू झाला असून आम्हाला या जोडीला पुन्हा मोठ्या पडद्यावर पाहायचे आहे, अशी मागणी चाहते करत आहेत. मृणाल आणि दुलकरच्या या भेटीमुळे 'सीता रामम २' च्या चर्चांना उधाण आले आहे. जरी पहिल्या भागाचा शेवट अतिशय भावुक आणि पूर्ण झाला असला, तरी चाहत्यांना ही जोडी एखाद्या नवीन प्रेमकथेत किंवा 'सीता रामम'च्या सिक्वलमध्ये पाहायची इच्छा आहे. आता दुलकर आणि मृणालच्या या फोटोमागचं रहस्य काय, हे काहीच दिवसांत उलगडेल, अशी चाहत्यांना आशा आहे.





# दिव्याला हवाय समजून घेणारा जोडीदार

दिव्या दत्ता ही बॉलीवूडमधील सर्वात प्रतिभावान अभिनेत्रींपैकी एक आहे. ती तीन दशकांहून जास्त काळापासून फिल्म इंडस्ट्रीत सक्रिय आहे. मोठ्या पडद्यावर प्रेयसी, पत्नी अशा विविध भूमिका साकारणारी दिव्या दत्ता खऱ्या आयुष्यात अजूनही अविवाहित आहे. एका मुलाखतीत तिने वयाच्या ४८ व्या वर्षीही आपण अविवाहित असून लग्न आता प्रायोरिटी नसल्याचं सांगितलं.

दिव्या पुढे म्हणाली, मी हे बऱ्याच चुकांमधून शिकले आहे. मी आधी पहिल्या प्रेमाच्या शोधात होते, पण नात्याची लाँग टर्म पार्टनरशीप किती कठीण असते, याची जाणीव मला झाली. मी प्रेम शोधण्याचा प्रयत्न केला, पण जेव्हा तुम्ही लग्न किंवा पार्टनरशीपबद्दल बोलता तेव्हा योग्य व्यक्तीबरोबर राहण्यासाठी एकमेकांची खूप काळजी घेण्याची आवश्यकता असते, असं दिव्या दत्ताने सांगितलं. दिव्याच्या मते, अभिनयक्षेत्रात वेगळी आव्हानं आहेत. त्यासाठी एक अतिशय सुरक्षित आणि समजूतदार जोडीदार आवश्यक आहे. तुम्ही एक कलाकार आहात, त्यात भर म्हणजे इंडस्ट्रीतलं काम खूपच अनप्रेडिक्टेबल आहे, त्याचबरोबर एक हाय-प्रोफाइल काम आहे. तुम्ही हुशारही आता, तर हे सगळं कॉम्बिनेशन सोपं नाही, असं दिव्या दत्ता म्हणाली. हे क्षेत्र असुरक्षित असल्याने ते समजून घेणारा जोडीदार हवा, असं दिव्या दत्ताला वाटतं. दिव्याने कबूल केलं की तिला डेटिंग करताना काही खूप छान लोक भेटले. पण कालांतराने तिला जाणवलं की ते तिच्यासाठी योग्य नाहीत. मला ते चुकीच्या पद्धतीने जाणवलं, असं ती म्हणाली. दिव्या म्हणाली, मी प्रेमासाठी तयार आहे, पण मला वाटत नाही की मी लग्न करेन, असं दिव्या दत्ताने नमूद केलं.



# प्रसिद्धीची नशा हे जुगारासारखंच व्यसन

एकेकाळची लोकप्रिय अभिनेत्री रिमी सेनने अभिनयाला रामराम ठोकून दुबईमध्ये स्वतःचा रिअल इस्टेट व्यवसाय सुरू केला आहे. तिने हिंदी चित्रपटसृष्टीतील वास्तव आणि तिच्या नवीन करिअरबद्दल मनमोकळेपणाने सांगितलं. ती म्हणाली, बॉलिवूडमध्ये अभिनेत्रींचे करिअर फार काळ टिकत नाही, असं मत रिमीने व्यक्त केलं. रिमी म्हणाली, रिअल इस्टेट हा एक स्थिर व्यवसाय आहे. बॉलीवूडची नशा उतरली, आता मला रिअल इस्टेटमध्ये रस आहे. चित्रपटसृष्टीतील करिअर फार काळ टिकणारं नसतं, खासकरून अभिनेत्रींसाठी. रिमी सेनने स्टारडमला एक प्रकारचं व्यसन म्हटलंय. मला वाटतं की प्रसिद्धीची नशा हे जुगारासारखंच एक व्यसन आहे. जुगार ही समस्या नाही, कारण हुशार माणसाला माहित असतं की टेबलवरून कधी उठायचं. कोणत्याही व्यवसायात, जेव्हापर्यंत तुमच्याकडे आदर आणि नाव दोन्ही असतं तेव्हा त्यातून कधी बाहेर पडायचं हे समजून घेणं महत्त्वाचं असतं. क्रिकेटमध्येही असंच असतं, असं मत रिमी सेनने व्यक्त केलं. कोणताही व्यवसाय करताना, त्यामागचा तुमचा दृष्टिकोन स्पष्ट असावा लागतो. त्याशिवाय व्यवसायात फक्त प्रवाहाबरोबर वाहत राहिलात, तर तुम्हाला आयुष्यभर संघर्ष करावा लागेल. तुम्ही दिशाहीन असाल आणि काम करून शेवटी थकून जाल. मी सुरुवातीपासूनच अभिनयाकडे एक व्यवसाय म्हणून पाहिलं. मला माहित होते की मी या इंडस्ट्रीत किती काळ टिकू शकते, असं रिमीने सांगितलं.

# दिलजीत झळकणार 'या' मराठमोळ्या अभिनेत्रीसोबत

'बॉर्डर-२' सिनेमाची सगळीकडे चर्चा होताना दिसते. हा सिनेमा प्रेक्षकांच्या पसंतीस देखील उतरला आहे. तर अवघ्या ६ दिवसांत चित्रपटाने२०० कोटींचा टप्पा ओलांडला आहे. दरम्यान, या चित्रपटात अभिनेता दिलीजीत दोसांझने वायुदल अधिकाऱ्याची भूमिका साकारली आहे. अनुराग सिंग दिग्दर्शित या चित्रपटात तो सनी देओल, वरुण धवन आणि अहान शेट्टीसोबत दिसत आहे. एकीकडे 'बॉर्डर-२' सिनेमाचं यश अनुभवत असतानाचा दिलजीत दोसांझचं नशीब फळफळलं आहे. लवकरच तो एका नव्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. दरम्यान, 'जब वी मेट', 'हायवे' यांसारखे सुपरहिट चित्रपट देणारे दिग्दर्शक इम्तियाज अली यांनी नव्या चित्रपटाची घोषणा केली आहे. चित्रपट समीक्षक तरण आदर्श यांनी आपल्या अधिकृत एक्स अकाउंटवर या प्रोजेक्टबद्दल प्रेक्षकांना माहिती दिली आहे. इतकंच नाहीतर या चित्रपटाच्या रिलीज डेटही जाहीर करण्यात आली आहे. निर्मात्यांनी हा चित्रपट १२ जून रोजी प्रदर्शित करण्याचा निर्णय घेतला आहे. पण, अद्याप चित्रपटाचं नाव गुलदस्त्यात ठेवण्यात आलं आहे. माहितीनुसार, या चित्रपटाचं काम सध्या पोस्ट-प्रॉडक्शनमध्ये आहे. ए.आर. रहमान यांनी संगीत दिले आहे आणि इर्शाद कामिल यांनी गाणी लिहिली आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार, हा रोमकॉम चित्रपट असल्याचं म्हटलं जात आहे. दिलजीत दोसांझच्या या आगामी प्रोजेक्टमध्ये मराठमोळी अभिनेत्री शर्वरी वाघ देखील असल्याचं सांगितलं जातं. याशिवाय सिनेमात वेदांग रैना आणि नसीरुद्दीन शाह यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. या प्रोजेक्टच्या माध्यमातून इम्तियाज अली आणि दिलजीत दोसांझ दुसऱ्यांदा एकत्र काम करताना दिसणार आहेत. त्यांनी यापूर्वी 'अमर सिंह चमकिला'मध्ये एकत्र काम केलं होतं.



# इमरानने अशी बदलली त्याची इमेज



इमरान हाश्मी सध्या त्याच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या टस्करी: द स्मगलर्स वेब या मालिकेमुळे चर्चेत आहे. नीरज पांडे दिग्दर्शित या मालिकेत इमरान एका कस्टम अधिकाऱ्याची भूमिका साकारत आहे. दरम्यान, इमरानने सिरियल किसर आणि लव्हर बॉय म्हणून त्याच्या प्रतिमेबद्दल खुलासा केला आहे. त्याने या प्रतिमेपासून मुक्त होण्यासाठी तो कसा प्रयत्न करत आहे हे देखील शेअर केले आहे. एका मुलाखतीत, इमरान हाश्मीने त्याच्या टाइपकास्टबद्दल बोलले. तो म्हणाला की कोणतीही एक भूमिका नसते, ती कधीही एक नसते. तो नेहमीच एक प्रवास असतो. शांघाय आणि टायगर ३ सारख्या चित्रपटांनी त्याच्याबद्दल लोकांचा दृष्टिकोन बदलण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. एक प्रकारे, जन्नतने ही स्टिरियोटाइप मोडली, जसे वन्स अपॉन अ टाइम इन मुंबईने केले. तर, ते एका चित्रपटाचे नाही तर अनेक चित्रपटांचे परिणाम होते. त्याच्या कारकिर्दीच्या सुरुवातीला झालेल्या टीकेची आठवण करून देताना, इमरान म्हणाला की त्याला त्याची काहीच हरकत नव्हती. मी असे म्हणणार नाही की समीक्षक चुकीचे होते. चित्रपटांबद्दल त्यांचे स्वतःचे मत होते, परंतु मला माहित होते की मी ते करू शकतो. म्हणून मी उत्तर दिले, 'मी शांघायसारखा चित्रपट बनवू शकतो.' म्हणून जर तुम्ही म्हणाल की, मी फक्त एकाच प्रकारचा चित्रपट करू शकतो, तर दिबाकर बॅनर्जीसारख्या दिग्दर्शकासोबत मी ते करू शकतो. तर ते फक्त स्वतःलाच नव्हे तर काही गोष्टी सिद्ध करण्याबद्दल होते, असे अभिनेत्याने सांगितले. इमरान हाश्मी आर्यन खानच्या द बॅड्स ऑफ बॉलीवूड या शोमध्ये स्वतः च्या भूमिकेत दिसला. त्यानंतर तो व्हायरल झाला. याचा त्याच्या कारकिर्दीवर काही परिणाम झाला का याबद्दल तो म्हणाला, मला खरोखर माहित नाही की याचा माझ्यावर काय परिणाम होईल. पण प्रासंगिक राहणे खूप कठीण आहे. जेव्हा तुम्ही ३५- ४० वर्षांचे असता तेव्हा एक नवीन प्रेक्षक उदयास येतात. जेव्हा द बॅड्स ऑफ बॉलीवूड सारखा चित्रपट येतो तेव्हा तो जनरेशन झेनचा आवाज बनतो. हे असे लोक आहेत ज्यांनी कदाचित माझे चित्रपट पाहिले नसतील. त्यांनी गाणी ऐकली असतील, इंस्टाग्रामवर काहीतरी पाहिले असेल, कदाचित काही व्हिडिओ देखील पाहिले असतील. ते फक्त त्याच्याशी जोडले जातात, नंतर या माणसाबद्दल अधिक जाणून घेऊ इच्छितात कारण तो एक दृश्य अगदी योग्य प्रकारे बसतो.



## प्रियांकाच्या 'द ब्लफ'चा ट्रेलर रिलीज

बॉलिवूड अभिनेत्री प्रियांका चोप्राचा नवा चित्रपट 'द ब्लफ'चा ट्रेलर प्रदर्शित झाला असून तो जबरदस्त आहे. या हॉलिवूड चित्रपटात देसी गर्ल मुख्य भूमिकेत असून स्वतःच्या ॲक्शनदृश्यांद्वारे तिने चाहत्यांची मने जिंकली आहेत. 'ही कहाणी रक्ताळलेल्या वाळूसोबत संपणार आहे, द ब्लफ हा चित्रपट २५ फेब्रुवारी रोजी प्राइम व्हिडिओवर येतोय' असे प्रियांकाने ट्रेलर शेअर करत म्हटले आहे. प्रियांका चोप्रा यात महिला सागरी चाचे एर्सेल 'ब्लडी मेरी' बोडेनची भूमिका साकारत आहे. या चित्रपटाची कहाणी १९ व्या शतकाच्या अखेरीस कॅरेबियन बेटावर आधारित आहे. प्रियांकाची व्यक्तिरेखा स्वतःचा पती आणि मुलांसोबत शांत जीवन जगत असताना अचानक तिच्या आयुष्यात संकटांची त्सुनामी येते, जेव्हा तिचा जुना कॅप्टन (कार्ल अर्बन) सूड घेण्यासाठी परत येतो. त्यापूर्वी प्रियांकाने त्याला फसवत खजिना घेऊन पळ काढलेला असतो. या चित्रपटाच्या कहाणीत सूड, आईचे प्रेम आणि याचबरोबर परिवाराच्या रक्षणासाठी जीव पणाला लावण्याची तयारी दिसून येणार आहे. प्रियांकाचा हा चित्रपट २५ फेब्रुवारी रोजी प्राइम व्हिडिओवर प्रदर्शित होणार आहे. चित्रपटात प्रियांका चोप्रा, कार्ल अर्बन, टेमुएरा मॉरिसन, इस्माइल क्रूज कोर्डोवा, सफिया ओकली- ग्रीन आणि वेदांत नायडू यासारखे कलाकार आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन फ्रँक ई. फ्लावर्स यांनी केले आहे. तर रुसो ब्रदर्सनी याची निर्मिती केली आहे.



# मला ग्लॅमरसाठी नाही तर टॅलेंटसाठी ओळखावं!

प्रसिद्ध दाक्षिणात्य अभिनेत्री साई पल्लवीने मनोरंजनविश्वात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. तिच्या अभिनयाचे तर सगळेच चाहते आहेत. शिवाय साई पल्लवी ही स्क्रीनवर विना मेकअप काम करते हे तिचं वैशिष्ट्य आहे. इतकंच नाही तर ती सिनेमांमध्ये फारसे बोल्ड कपडेही परिधान करत नाही. असं का? यामागचं कारण तिने नुकतंच एका मुलाखतीत सांगितलं. साई पल्लवी एका मुलाखतीत म्हणाली, मी कॉलेजमध्ये असताना डान्स स्पर्धेत भाग घेतला होता. त्यावेळी मी हाय स्लिट ड्रेस घातला होता. त्यात माझा थोडा बोल्ड लूक होता. तो टँगो डान्स होता आणि मी त्यासाठी खूप मेहनत घेतली होती. मात्र व्हिडिओ ऑनलाईन व्हायरल झाला आणि लोक त्यात माझा डान्स नाही तर माझ्या कपड्यांकडेच पाहत होते. त्यावर कमेंट करत होते. परफॉर्मन्स सोडून लोक माझ्या शरिरावर फोकस करत होते. ती पुढे म्हणाली, मला ते पाहून खूप वाईट वाटलं. मला असं वाटलं की लोक मला एक ऑब्जेक्ट म्हणून पाहत आहेत. या घटनेने माझ्यावर वाईट परिणाम झाला. यामुळेच मी नंतर बोल्ड कपडे घालणंच सोडून दिलं. लोकांनी मला माझ्या ग्लॅमरसाठी नाही तर टॅलेंट पाहून ओळखावं. मी जशी आहे तसंच लोकांनी पाहावं असं मला वाटतं. अगदी साधेपणाच्या भावनेतून हे असावं. लोकांनी माझ्या भूमिका, अभिनय लक्षात ठेवावा ना की मी कशी दिसते हे बघावं. साई पल्लवी आगामी 'एक दिन' या हिंदी सिनेमातून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. मे महिन्यात हा सिनेमा येत आहे. यामध्ये तिची जोडी जुनैद खानसोबत जमली आहे. तसंच ती रणबीर कपूरसोबत 'रामायण' सिनेमातही ती दिसणार आहे. यात ती माता सीतेच्या भूमिकेत आहे. हा सिनेमा पुढील वर्षी येणार आहे.

# 'द केरला स्टोरी २'चे मोशन पोस्टर समोर


विपुल अमृतलाल शाह यांचा बहुचर्चित सिनेमा 'द केरळ स्टोरी २: गोज बियॉन्ड' सिनेमाचं जबरदस्त मोशन पोस्टर अखेर रिलीज झालं आहे. प्रत्येक फ्रेममध्ये भीती, वेदना आणि कटू सत्य पाहायला मिळतं. या चित्रपटाचा टीझर नुकताच प्रदर्शित झाला आहे. हा सिनेमा पूर्णपणे सत्य घटनांपासून आणि गंभीर वास्तवापासून प्रेरित असल्याचा दावा करण्यात आला आहे. 'द केरळ स्टोरी'द्वारे समाजाला हादरवून टाकणाऱ्या सत्याची मांडणी करणारे विपुल अमृतलाल शाह आता आणखी एक भयाण वास्तव प्रेक्षकांसमोर आणणार आहेत. 'द केरळ स्टोरी २: गोज बियॉन्ड'चं हे मोशन पोस्टर अंगावर काटा आणणारं, अस्वस्थ करणारं आणि तीव्र संताप व्यक्त करणारं आहे. हा सीक्वल पहिल्या भागापेक्षा अधिक खोल, अधिक भयावह असणार आहे. यावेळी निर्माते अशा सत्यांचा उलगडा करण्याचा दावा करत आहेत जे फसवणूक, मानवता आणि द्वेष यांच्याही पलीकडे जातात. आतापर्यंतच्या सर्वात अस्वस्थ करणाऱ्या आणि थरारक पोस्टर्सपैकी एक मानला जात असून, चित्रपटात समोर येणाऱ्या भयानक सत्यांची झलक देतो. कोणतीही तडजोड न करता, प्रेक्षकांसमोर निर्भीडपणे वास्तव मांडण्याचा सिनेमाचा उद्देश यात दिसून येतो. याच पोस्टरमध्ये टीझरची रिलीज डेटही जाहीर करण्यात आली आहे. 'द केरळ स्टोरी' हा चित्रपट देशातील मोठ्या ब्लॉकबस्टरपैकी एक ठरला होता. 'लव्ह जिहाद' आणि धर्मांतर यांसारख्या संवेदनशील विषयांवर भाष्य करत या सिनेमाने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले. 'द केरळ स्टोरी २: गोज़ बियॉन्ड' हा सिनेमा सनशाइन पिक्चर्सच्या बॅनरखाली तयार करण्यात आला आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन नॅशनल अवॉर्ड विजेते कमाख्य नारायण सिंह यांनी केले आहे. कथा व पटकथा अमरनाथ झा आणि विपुल अमृतलाल शाह यांनी लिहिली आहे. चित्रपटाचे सह-निर्माते आशिन ए. शाह आहेत. संगीत मनन शाह यांचे असून, गीते मनोज मुंतशिर यांनी लिहिली आहेत. हा सिनेमा २७ फेब्रुवारी २०२६ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.

# साऊथ दिग्दर्शकाला वाटते ही अभिनेत्री लकी

अभिनेत्री दीपिका पादुकोण बॉलिवूडची स्टार अभिनेत्री आहे. पदार्पणातूनच ब्लॉकबस्टर सिनेमा दिल्यानंतर दीपिकाचा भाव वाढला. त्यानंतर तिने अनेक सुपरहिट सिनेमांमध्ये काम केलं. आता दीपिका साऊथ दिग्दर्शक ॲटलीच्या AA22X-6 या सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या सिनेमात दीपिकाचा वेगळा अवतार पाहायला मिळणार आहे. दीपिका माझ्यासाठी लकी चार्म असल्याचं नुकतंच साऊथ दिग्दर्शक ॲटलीने म्हटलं आहे. जवान सिनेमानंतर ॲटली पुन्हा एकदा दीपिकासोबत काम करत आहे. हा दोघांचा दुसरा सिनेमा असून एका मुलाखतीत ॲटलीने दीपिकाचं भरभरुन कौतुक केलं. तो म्हणाला, ती माझी लकी चार्म आहे. दीपिकासोबत ही माझी दुसरी फिल्म आहे आणि तिच्यासोबत काम करण्याचा अनुभव अप्रतिम असतो. ती खरंच कमाल आहे. आई झाल्यानंतर ती या चित्रपटातून पुनरागमन करत आहे आणि मला पूर्ण विश्वास आहे की यावेळी प्रेक्षकांना दीपिकाचा एक वेगळाच अंदाज पाहायला मिळेल. या चित्रपटात प्रेक्षकांना दीपिका पादुकोणचा एक पूर्णपणे नवा अवतार पाहायला मिळणार असल्याचंही ॲटलीने सांगितलं आहे. त्यामुळे तिच्या भूमिकेबाबत आणि चित्रपटाच्या कथेबाबत प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. ॲटलीचा आतापर्यंतचा सर्वात मोठा प्रोजेक्ट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या चित्रपटात अल्लू अर्जुनही झळकणार आहे. जरी AA22X-6 संदर्भातील अधिक तपशील अद्याप उघड झाले नसले, तरी ॲटलीची भव्य दृष्टी आणि दीपिका पादुकोणची स्टार पॉवर यामुळे अपेक्षा आधीच प्रचंड वाढल्या आहेत. दीपिका पादुकोणकडे यंदा आणखी एक मोठा प्रोजेक्टही आहे. ती 'किंग' या चित्रपटात झळकणार असून, हा चित्रपट २४ डिसेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात तिची पुन्हा शाहरुखसोबत जोडी जमली आहे.



# हाऊस फादरच्या भूमिकेत सिद्धार्थ चांदेकर




नात्यांच्या गुंतागुंतीकडे हळुवारपणे पाहाणाऱ्या आणि माणसाच्या अंतर्मनातील हालचाली टिपणाऱ्या कथा दिग्दर्शक आदित्य इंगळे यांचा 'माया' हा नवा चित्रपट आता त्याच्या भावविश्वाचा पुढचा टप्पा ठरत असल्याचं नुकत्याच प्रदर्शित झालेल्या टीझरमधून दिसून येते. टीझरमधून एक महत्त्वाचा विचार पुढे येतो. माणूस खरंतर एकटेपणाला घाबरत नाही, तर पोरकेपणाच्या भावनेला घाबरतो. 'माया'चा टीझर हा भाव अतिशय हळुवारपणे उलगडतो. चित्रपटात सिद्धार्थ चांदेकरने साकारलेली हाऊस फादरची भूमिका नात्यांकडे पाहाण्याचा वेगळा, समजूतदार दृष्टिकोन देते. मुक्ता बर्वे, विजय केंकरे आणि रोहिणी हट्टंगडी यांच्या व्यक्तिरेखा आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर उभ्या असलेल्या माणसांच्या भावविश्वाचं प्रभावी प्रतिनिधित्व करतात. तर गिरीश ओक यांची व्यक्तिरेखा विशेष लक्ष वेधून घेते. आजाराने ग्रस्त असलेला, अंतर्मुख आणि काहीसा विचित्र स्वभाव असलेला हा माणूस मनात खोलवर साठवून ठेवलेल्या आघातांमुळे इतरांपासून दुरावलेला दिसतो. त्यांचा अस्वस्थपणा आणि मनातील अढी कथेला गंभीर आणि विचारप्रवर्तक वळण देताना दिसते. चित्रपटाबद्दल दिग्दर्शक आदित्य इंगळे म्हणतात, ''बऱ्याच वेळा आपण मनाला गाठी मारून ठेवतो. आयुष्यात पूर्वी घडून गेलेल्या काही घटना आपल्यावर खोलवर आघात करतात आणि त्यालाच आपण संपूर्ण आयुष्य समजतो. त्या अनुभवांवर प्रतिक्रिया देण्यात किंवा मनात अढी धरून ठेवण्यात आपण खूप काळ घालवतो. काळाच्या ओघात ही अढी सुटली, तरच आयुष्य प्रवाही होऊ शकतं. ही अढी नात्यांमधून, जिव्हाळ्यातून सुटते आणि त्यानंतर आयुष्य पुन्हा एकदा पुढे सरकायला लागतं. 'माया' हा चित्रपट याच भावनिक प्रवासावर भाष्य करतो. शालिनी सिनेमाज आणि नितीन वैद्य प्रॉडक्शन निर्मित या चित्रपटाचे निर्माते डॉ. सुनील दातार, अलका मधुकर दातार आणि नितीन प्रकाश वैद्य आहेत. आदित्य इंगळे दिग्दर्शित 'माया' हा चित्रपट २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.

# लांजेकरांच्या 'या' सिनेमाचं प्रदर्शन पुढे ढकललं

लोकप्रिय दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांच्या 'श्री शिवराज अष्टक' मालिकेतील 'रणपति शिवराय स्वारी आग्रा' या आगामी सिनेमाची सर्वांनाच उत्सुकता लागून राहिली आहे. 'श्री शिवराज अष्टक' मालिकेतील पहिले पाच चित्रपट गाजल्यानंतर, आता सहाव्या 'रणपति शिवराय स्वारी आग्रा' या चित्रपटाची सर्वत्र चर्चा सुरू आहे. अशातच या सिनेमाबाबत एक अपडेट समोर येत आहे, ती म्हणजे चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या तारखेत बदल करण्यात आला आहे.

'शिवराज अष्टक'मधील पुढचं पुष्प म्हणून 'रणपति शिवराय स्वारी आग्रा' सिनेमा येत्या ३० जानेवारी २०२६ ला प्रदर्शित होणार होता. परंतु, अवघे दोन दिवस बाकी असताना या सिनेमाच्या प्रदर्शनाची तारीख बदलण्यात आली आहे. सिनेमाच्या प्रदर्शनाच्या तारखेबाबत टीमकडून सोशल मीडियावर पोस्ट शेअर करण्यात आली आहे. या पोस्टद्वारे 'रणपति शिवराय स्वारी आग्रा' सिनेमाच्या प्रदर्शनाची नवीन तारीख जाहीर केली आहे. हा सिनेमा आधी ३० जानेवारी रोजी प्रदर्शित होणार होता. मात्र, ३० ऐवजी ६ फेब्रुवारी २०२६ रोजी 'रणपति शिवराय स्वारी आग्रा' हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी निर्माते अमेय खोपकर यांनी 'रणपति शिवराय स्वारी आग्रा'सह 'पुन्हा एकदा साडे माडे तीन' सिनेमा प्रदर्शित होण्याबद्दल नाराजी व्यक्त केली होती. दोन्ही सिनेमे एकाच दिवशी प्रदर्शित होऊ नये, याबाबत त्यांनी दिग्पाल यांच्याशी संपर्क साधल्याचं सांगितलं होतं. मात्र, दिग्पाल यांच्याकडून काहीच उत्तर आला नसल्याचंदेखील ते म्हणाले होते. अशातच आता 'रणपति शिवराय स्वारी आग्रा' सिनेमा एक आठवड्याने प्रदर्शित होत आहे असं सांगण्यात आलं आहे. त्यामुळे 'रणपति शिवराय स्वारी आग्रा' सिनेमा बघण्यासाठी प्रेक्षकांना आणखी एक आठवडा वाट बघावी लागणार आहे.



# मला राजकारण खूप आवडतं; पण...

अभिनेता रितेश देशमुखचं राजकारणाशी जवळचं नातं आहे. वडील विलासराव देशमुख हे माजी मुख्यमंत्री होते. विलासरावांना आणि संपूर्ण देशमुख कुटुंबाला मानणारा मोठा वर्ग आहे. रितेशचे दोन्ही भाऊ आजही राजकारणात आहेत. रितेश राजकारणात नसला तरी अनेकदा तो राजकीय मुद्द्यांवर मत व्यक्त करताना दिसतो. आता नुकतंच त्याने राजकारणात येणार की नाही यावर उत्तर दिलं आहे. राहुल महाजनच्या पॉडकास्टमध्ये रितेश देशमुखने हजेरी लावली होती. तेव्हा रितेश म्हणाला, लोकांचं माझ्यावर अभिनेता म्हणून प्रेम आहे. तेच प्रेम मला इतर कोणत्या क्षेत्रात मिळेल हे गरजेचं नाही. आजपर्यंत अनेक अभिनेते नंतर राजकारणात गेले आणि त्यांनी चांगलं कामही केलं. काही असेही आहेत जे निवडणूकीत उभे राहिले पण जिंकू शकले नाहीत. मला वाटतं राजकारणासाठी वेगळ्या प्रकारची कमिटमेंट लागते. सध्या मी जे करतोय त्यात मी खूश आहे. जे केल्याने तुम्हाला आनंद मिळतो तेच आपण केलं पाहिजे असं मी नेहमीच सांगतो. रितेश पुढे राहुल महाजनला म्हणतो, आपण दोघांनी लहानपणापासून राजकारण खूप जवळून बघितलं आहे. अजूनही बघत आहोत. कधी शिकायची गरज नव्हती कारण घरातच राजकीय वातावरण असल्याने आपोआपच आपण ते शिकत गेलो. मी राजकारणात चांगलं काहीतरी करु शकतो असा विचार तू माझ्याबद्दल करतोय त्यासाठी आभार. पण मी असा विचार करत नाही. कारण प्रॅक्टिकली या गोष्टी करणं खूप वेगळं आहे. तू जर मला विचारलंस की मला राजकारण आवडतं की नाही? तर हो, मला राजकारण खूप आवडतं. मला राजकारण समजतं. आज राजकारणात काय काय गोष्टी गरजेच्या आहेत हेही मला माहित आहे. पण राजकारण सजमणं आणि प्रत्यक्षात उतरुन काम करणं यात खूप मोठं अंतर आहे. मी आज माझ्या भावांना इतकं जवळून बघत आहे जे राजकारणात आहेत. घरी जेवताना अनेक विषयांवर चर्चा होते. प्रत्येकजण आपापल्या परीने अनेक गोष्टी करतोय. वातावरण बदलतं, कधी तुम्ही सत्तेत असता तर कधी विरोधात असता हे सुरुच राहतं. पण तुम्हाला लोकांचं प्रेम मिळालंय म्हणून तुमच्यासाठी निवडणूक खूप सोपी होते असं गरजेचं नाही. कारण लोक खूप हुशार आहेत. एका अभिनेत्याकडून तुम्हाला असलेली अपेक्षा आणि एका नेत्याकडून असलेली अपेक्षा वेगळी. काहींना ते दोन्ही जमतं ही खरोखरंच वाखणण्याजोगी गोष्ट आहे. पण मला ते शक्य नाही.





# पत्नीने पतीवर आवाज चढवला पाहिजे!

राणी मुखर्जीला नुकतीच मनोरंजनविश्वात तीन दशकं पूर्ण झाली आहेत. सध्या ती तिच्या 'मर्दानी ३' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. राणी नेहमीच विविध विषयांवरील तिची मतं ठामपणे मांडत असते. अशातच ती पुन्हा एकदा तिच्या एका वक्तव्यामुळे चर्चेत आली आहे. वडिलांच्या स्वभावाचा मुलाच्या स्वभावावर कसा परिणाम होतो, याबद्दल राणी मुखर्जी म्हणाली, मला असं वाटतं, आदर घरातूनच सुरू होतो. जेव्हा तुम्ही तुमच्या आईला घरी चुकीची वागणूक मिळताना पाहता, तेव्हा त्या घरातील मुलावर याचा परिणाम होतो. त्याला असं वाटू लागतं की जर माझ्या आईला अशी वागणूक मिळत आहे तर इतर स्त्रियांनासुद्धा अशीच मिळत असेल.

राणी पुढे म्हणाली, मला असं वाटतं, सर्व वडिलांनी याची जबाबदारी घ्यायला हवी; कारण ते जसं त्यांच्या पत्नीला वागवतात, तेच त्यांची मुलं पाहून मोठी होतात. तेच जर तुमच्या आईला चांगली वागणूक मिळत असेल, तिला आदर दिला जात असेल तर मुलांनाही कळतं की स्त्रियांना समाजात सन्मान आहे. राणी पुढे म्हणाली, हे सगळं घरातूनच सुरू होतं. पतीने पत्नीवर आवाज वाढवणं अशा गोष्टीसुद्धा व्हायला नाही पाहिजे. मग त्या पत्नीने पतीवर आवाज वाढवला पाहिजे. याच संभाषणात तिने तिच्या शाळेतील एक प्रसंग सांगितला.

अभिनेत्री म्हणाली, 'मी फक्त एकाच मुलाला मारलं आणि बाकीची सगळी मुलं माझे मित्र झाले. तुम्ही फक्त माझ्या नवऱ्याला जाऊन विचारू नका की त्याच्याबरोबर घरी काय होतं. दरम्यान, राणी मुखर्जी सध्या तिच्या 'मर्दानी ३' चित्रपटामुळे चर्चेत आहे. यशराज फिल्मसनेच या चित्रपटाची निर्मिती केली आहे. राणी या चित्रपटात मुख्य भूमिकेत असून यापूर्वी आलेल्या चित्रपटाच्या दोन्ही भागांना प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळालेला आहे.



# 'द डायरी मणिपूर'मध्ये झळकणार मोनालिसा

प्रयागराज कुंभमेळ्या दरम्यान माला आणि मोती विकून प्रसिद्ध झालेली मोनासिला पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. मोनालिसाचा चित्रपट 'द डायरी ऑफ मणिपूर'चे पोस्टर प्रदर्शित करण्यात आले आहे. या चित्रपटात ती एका गावातील युवतीच्या भूमिकेत आहे.

पोस्टरमध्ये ती चित्रपटाच्या नायकासोबत दिसून येते. मोनालिसा कुंभमेळ्यादरम्यान माला विकत असताना कुणीतरी तिचे छायाचित्र टिपले, तिचे हास्य, तिचे डोळे आणि साधेपणाने युक्त सौंदर्य पाहून लोकांचे लक्ष वेधले गेले. तिचे छायाचित्र व्हायरल होताच तिच्या जीवनाने एक नवे वळण घेतले. स्वत:च्या पहिल्या गीतानंतर मोनालिसाला सनोज मिश्रा यांचा चित्रपट 'द डायरी ऑफ मणिपूर'साठी करारबद्ध करण्यात आले होते. ती आता इव्हेंट्स आणि ब्रँड प्रमोशनमध्येही भाग घेत आहे. आता मुंबईत स्वत:चे घर खरेदी करण्याचे तिचे स्वप्न आहे.




# श्रेयस तळपदेचा 'मर्दिनी' लवकरच भेटीला

मोठ्या पडद्यावर नारीसामर्थ्याची प्रभावी गाथा उलगडणारा मराठी चित्रपट 'मर्दिनी' येत्या ३ जुलै २०२६ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. श्रेयस तळपदे प्रस्तुत, फ्लुएन्स मोशन पिक्चर्स प्रा. लि. आणि ओ डी आय ग्रुप निर्मित हा सिनेमा स्त्रीशक्तीचा सशक्त, प्रेरणादायी आणि भावनिक आविष्कार मांडतो. प्रत्येक स्त्रीच्या अंतरंगातील मर्दिनीला जागं करणारी ही कथा केवळ संघर्ष दाखवत नाही, तर स्त्रीच्या संयम, धैर्य आणि आत्मबळाची ठाम ओळख करून देते.

नुकत्याच प्रदर्शित झालेल्या पोस्टरमध्ये ठाम पाऊल, उग्र भाव आणि ज्वालांनी वेढलेलं 'मर्दिनी' हे नाव दिसून येतं, ज्यातून चित्रपटाची तीव्रता आणि आशय स्पष्ट होतो. चित्रपटात प्रार्थना बेहेरे, अभिजीत खांडकेकर, जितेंद्र जोशी आणि राजेश भोसले यांच्या सशक्त भूमिका पाहायला मिळणार आहेत. यासोबतच बालकलाकार मायरा वैकुळ हिची भूमिका कथेला वेगळी भावनिक उंची देते, असं म्हटलं जात आहे. अजय मयेकर यांचा दिग्दर्शक म्हणून हा पहिलाच चित्रपट असून, दिप्ती तळपदे यांच्या निर्मितीखाली 'मर्दिनी' साकारत आहे. सहनिर्माती टिना राकेश कोठारी आहेत. चित्रपटाचं छायांकन शब्बीर नाईक, संकलन अभिषेक शेठ, संगीत हितेश मोडक, तर पटकथा व संवाद महाबळेश्वर नार्वेकर यांनी लिहिले आहेत.

ताकदीला आवाज आणि धैर्याला दिशा देणारा 'मर्दिनी' हा चित्रपट ३ जुलै २०२६ पासून मोठ्या पडद्यावर प्रदर्शित होणार असून, तो प्रेक्षकांना विचार करायला आणि प्रेरित व्हायला नक्कीच भाग पाडेल.

# आधुनिक वाल्मीकि गदिमा



**'त्या तिथे पलीकडे तिकडे, माझिया प्रियेचे झोपडे...' चित्रसदृश, सोपी, साधी, रम्य व स्वप्निल शब्दरचनेच्या १९५२ सालच्या 'लाखाची गोष्ट' चित्रपटातील या गाण्यात 'डे' या शब्दाची जादू करणारे कविराज गदिमा व स्वरांचे जादूगार सुधीर फडके यांच्या आपापल्या क्षेत्रातील कौशल्य करामतीत, तसेच मालती पांडे यांच्या बारीक मुरक्या व अवखळ स्वरांच्या साथीत या गीताने कीर्तिमान शाबीत केले.**

'ऐकशील का रे माझे अर्थहीन गीत? दूर दूर जाते धरुनी उरी तुझी प्रीत...' वरील चित्रपटात नायिकेने तटस्थ व गंभीर मुद्रेने नायकाला दोष न देता आपल्या व्यथा समारंभातील या गाण्यात संयमाने व्यक्त करून गदिमाच्या चपखल शब्दांना व आशा भोसले यांच्या आर्त स्वरांना योग्य न्याय दिला आहे. 'जाळीमंदी पिकली करवंद, मज लाज वाटते सांगाया ते धनी' कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळातील १९५० सालच्या 'पुढचं पाऊल' सिनेमातील हा लावणीचा आविष्कार सौंदर्यखणी हंसा वाडकरवर चित्रित झाला.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मराठीतील ही बहुधा पहिलीच लावणी असेल. बाबूजींच्या संगीतात माणिक वर्मा यांच्या गायकीने बाजी मारली. 'फड सांभाळ तुऱ्यावर आला तुझ्या उसाला लागल कोल्हा...' 'मल्हारी मार्तंड' चित्रपटातील ही लावणी म्हणजे लावणीच्या प्रांतातील सम्राज्ञीच आहे. लावणीमध्ये मोजक्या पण ठसकेबाज शब्दांनी शृंगार रसाची सेवा करताना बीभत्स होऊ न देता शब्दातील ठसकेबाज रोख गर्भित अर्थाने बेमालूम भरण्याचे त्यांचे कसब न्यारेच होते. 'आठवणीच्या आधी जाते तिथे मनाचे निळे पाखरू खेड्यामधले घर कौलारू' १९५४ च्या 'ऊन पाऊस' चित्रपटातील ग. दि. मा. यांचा अवीट आविष्कार.

'इंद्रायणी काठी देवाची आळंदी' गदिमांनी अभंग वजा संत परंपरेला साजेल असे हे गीत १९५३ सालच्या 'गुळाचा गणपती' चित्रपटासाठी लिहिले. शास्त्रीय गायक पं. भीमसेन जोशी यांनी आपल्या गंधर्वी आवाजात ते अमर केले. शब्दांना कोळून प्यालेले, मथितार्थ खच्चून भरलेले, अवतीभोवती तसेच निसर्ग दृश्यांचे खोल निरीक्षण करून अंतःकरण ओतून काव्य लिहिणाऱ्या व भूलोकी संचार करणाऱ्या कवीत गदिमांचे नाव शीर्षस्थ आहे. लावणी, भूपाळी, भावगीत, भक्तिगीत, प्रेमगीत, देशभक्तीपर गीतांवर सर्वांगसुंदर काव्य लिहिणारे गदिमा हे मराठी चित्रपटसृष्टीला लाभलेले एक वरदान होते.


'बाळा जो जो रेऽऽ पापणीच्या पंखात झोपू दे, डोळ्यांची पाखरे' १९५० सालच्या 'बाळा जो जो रे' चित्रपटातील हे अंगाई गीत महाराष्ट्रातील घराघरांतील पारंपरिक ठेवाच आहे. 'नाच रे मोरा आंब्याच्या वनात नाच रे मोरा नाच' १९५८ सालच्या 'देवबाप्पा' सिनेमांतल्या या बालगीतानेही मराठी घरांचा ताबा घेतला होता. त्या काळी लहान मुले-मुली शाळेतील कार्यक्रमात व इतर उत्सवात हे नृत्यगीत हमखास सादर करायचे. राजा परांजपे, सुधीर फडके व गदिमा या त्रयींनी एकत्र येऊन कितीतरी चित्रपटाद्वारे मराठी चित्रपटसृष्टीला सोनियाचे दिवस प्राप्त करून दिले होते. 'दिवसामागुन दिवस चालले ऋतु मागुणी ऋतु जिवलगा कधी रे येशील तू' १९६१ सालच्या 'सुहासिनी' सिनेमातील या गाण्यात गदिमांनी शब्दांकित केलेली विरही प्रीती आशा भोसले यांनी आपल्या भावपूर्ण आर्त आवाजाच्या पालखीत बसविली.

'लिंब लोण उतरू कशी असशी दूर लांब तू' इथूनी दृष्ट काढतेऽ निमिष एक थांब तू' १९६८ सालच्या 'एकटी' चित्रपटात गदिमांनी योग्य दृष्टांताद्वारे आई व मुलाच्या आंतरिक जिव्हाळ्याचे अपूर्व वर्णन करताना भावनिक उकल करून कवित्व सिद्ध केले. शब्द तर त्यांचे दास होते. काव्यालंकाराने नटलेले प्रसंगानुरूप काव्य ते निमिषार्धात रचित असत म्हणूनच त्यांना शब्दप्रभू म्हटले आहे. चित्रपट माध्यमातील गीतांना सबगोलंकार संस्कृतीतून बाहेर काढण्यासाठी त्यांनी निर्गुण भक्तीची साधना काव्याद्वारे केली. रसिकांच्या चित्तवृत्ती पल्लवित करण्यासाठी १९७० सालच्या 'मुंबईचा जावई' चित्रपटात गदिमा, सुधीर फडके व आशाताई हा त्रिवेणी संगम कारणीभूत झाला. आशा भोसले यांचे सूर तर नुसते हिंदोळत होते. 'या चिमण्यांनो परत फिरा रे! घराकडे अपुल्या...'

१९६८ सालच्या 'जिव्हाळा'मधील या भावपूर्ण गाण्यात आईला लागलेली मुलांची चिंता व जिव्हाळा अतिशय आर्त शब्दांची योजना करून आईची माया उद्धृत केली आहे. लता यांनी आपल्या शब्दांनी हे गाणे अमर केले. (१) एका तळ्यात होती, बदके पिले सुरेख... (२) गोरी गोरी पान, फुलासारखी छान... गदिमांनी रचलेल्या या अमर रचना वास्तविक लक्ष्मीची पाऊले किंवा सुखाचे गावी या प्रदर्शित न झालेल्या चित्रपटांसाठी होत्या. गदिमा रचित अमर काव्य गीतरामायणाबद्दल काय बोलावे. तो कवीच्या काव्यश्रेष्ठतेचा स्वतंत्र व प्रदीर्घ विषय आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अंदमानातील वास्तव्याबद्दल लिहिलेले कवण. 'झोपी गेला महावीर मग महाकवी जागे पत्रलेखणी वाचुन जमते काव्याचे धागे अक्षर वायय असे निर्मिता ओसरला काळ दिव्यात्म्याने शरीराचा त्या केला सांभाळ' 'एका महाकवीने बांधलेली दुसऱ्या महाकवीची ही शब्दपूजा.' अशा या महाकवीची काही चित्रपटातील कवनांचे वर्णन वानगीदाखल केली आहे. गजानन दिगंबर माडगूळकर यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील माडगुळे गावी झाला. वडील औंध संस्थानात कारकून होते. शिक्षण आटपाडी, कुंडल व औंधला झाले. बालपणापासून साहित्याची व काव्याची आवड होती. चित्रपटात कामे करण्यास सुरुवात केली. ब्रह्मचारी (१९३८), ब्रँडीची बाटली (१९३८) आदी चित्रपटात भूमिका केल्या. १९४७ साली 'रामजोशी' चित्रपटात सर्वप्रथम कथा, पटकथा, संवाद व गीते लिहिलीत. हिंदी चित्रपट 'दो आँखे बारह हाथ', नवरंग, गुंज उठी शहनाई, आदमी सडक का, तुफान और दिया यात पटकथा व संवाद लिहिलेत. गदिमांचा पद्मश्री पुरस्कार, विष्णुदास भावे सुवर्ण पदकाने सन्मान झाला. ते १९६२ ते १९७४ पर्यंत राज्यपाल नियुक्त आमदार होते. गदिमांनी १५७ मराठी चित्रपटांसाठी कथा, पटकथा, संवाद लिहिले व दोन हजारांच्या वर गाणी लिहिलीत. १४ डिसेंबर १९७७ रोजी या आधुनिक वाल्मीकिचे भूतलावरील वास्तव्य संपले.

रमेश पोफळी

# 'हेरा फेरी ३'ला होतोय यामुळे उशीर




परेश रावल, अक्षय कुमार आणि सुनील शेट्टी या तिकडीचा सुपरहिट 'हेरा फेरी' सिनेमाच्या तिसऱ्या भागाचं सध्या शूट सुरु आहे. परेश रावल यांचं बाबुराव आपटे कॅरेक्टर प्रेक्षकांच्या आवडीचं आहे. काही महिन्यांपूर्वी 'हेरा फेरी ३'चा वाद समोर आला होता.

परेश रावल यांनी अचानक सिनेमा सोडण्याचा निर्णय घेतला होता. यावर अक्षय कुमारने त्यांच्यावर २५ कोटींचा नुकसानभरपाईचा दावा केला होता. काही दिवसांनी वाद मिटला आणि परेश रावल यांची पुन्हा एन्ट्री झाली. आता पुन्हा सिनेमाला का विलंब होतोय याचं कारण परेश रावल यांनी नुकतंच एका मुलाखतीत सांगितलं. एका मुलाखतीत परेश रावल म्हणाले, हेरा फेरी ३ नक्कीच येणार आहे. पण सिनेमाला विलंब होत आहे याच्याशी माझा संबंध नाही. अक्षय कुमार आणि मेकर्स यांच्यात काही टेक्निकल अडचणी आल्या आहेत. यामुळेच सिनेमाला उशीर होत आहे.

अक्षय कुमारने २५ कोटींच्या नुकसानभरपाईची केस केली यावर परेश रावल म्हणाले, याची जरा जास्तच चर्चा झाली. अक्षयने माझ्यावर २५ कोटींची केस केली ते सगळं ठीक आहे...हे म्हणजे कछुआ छाप अगरबत्तीसारखं आहे. जेव्हा अक्षय आणि मेकर्समधला वाद मिटेल तेव्हा मी सिनेमा साईन करायला तयार आहे. बाबूराव या आयकॉनिक भूमिकेवर परेश रावल म्हणाले, बाबूरावशिवाय हा सिनेमा बनवण्याचा प्रयत्न केला तर तो डिझास्टर होईल. बाबूरावशिवाय हेरा फेरी होऊच शकत नाही.

# सलमान करणार वडील सलीम यांच्यावरील बायोपिकचं दिग्दर्शन?



बॉलिवूडचा 'सुलतान' सलमान खान आपल्या कुटुंबाप्रती असलेल्या प्रेमासाठी नेहमीच ओळखला जातो. आता त्याने आपल्या वडिलांसाठी, म्हणजेच दिग्गज पटकथा लेखक सलीम खान यांच्यासाठी एक अत्यंत खास आणि भावनिक प्रोजेक्ट हाती घेतला आहे. माहितीनुसार, सलमान खान लवकरच वडील सलीम खान यांच्या जीवनावर आधारित 'बायोपिक'ची निर्मिती करणार असल्याची चर्चा आहे. सलमान खानसाठी हा केवळ एक चित्रपट नसून, आपल्या वडिलांच्या गौरवशाली कारकिर्दीला दिलेली एक मानवंदना असणार आहे. सलीम खान यांनी केवळ सलमानचे करिअर घडवले नाही, तर भारतीय सिनेमाला एक नवी दिशा दिली. 'शोले', 'जंजीर' आणि 'दीवार' यांसारख्या अजरामर चित्रपटांच्या लेखनामागे त्यांचा मोठा वाटा आहे. हा बायोपिक त्यांच्या संघर्षापासून ते यशाच्या शिखरापर्यंतचा प्रवास प्रेक्षकांसमोर मांडणार आहे. काही रिपोर्ट्सनुसार, सलमान खान या चित्रपटाची केवळ निर्मितीच करणार नाही, तर तो स्वतः या चित्रपटाद्वारे दिग्दर्शन क्षेत्रातही पाऊल टाकेल अशी शक्यता आहे. त्याला आपल्या वडिलांची गोष्ट अत्यंत अचूकपणे आणि संवेदनशीलतेने पडद्यावर मांडायची आहे, त्यामुळे तो दिग्दर्शनाची जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेण्याची शक्यता आहे. हा प्रोजेक्ट २०२७ च्या सुरुवातीला फ्लोअरवर जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सलीम खान आणि जावेद अख्तर यांची जोडी बॉलिवूडमधील सर्वात यशस्वी लेखकांची जोडी मानली जाते. त्यामुळे या बायोपिकमध्ये या जोडीचा प्रवास, त्यांच्यातील मैत्री आणि व्यावसायिक नाते याचंही दर्शन घडण्याची शक्यता आहे. या चित्रपटात सलीम खान यांची भूमिका कोणता अभिनेता साकारणार, याबाबत मात्र अद्याप कमालीची गुप्तता पाळण्यात आली आहे. सलमान खान सध्या त्याच्या आगामी 'बॅटल ऑफ गलवान' या चित्रपटामुळे चर्चेत आहे, जो एप्रिल २०२६ मध्ये प्रदर्शित होणार आहे.

# सुपरहिट हीरो-हिरोईन त्यांच्या अटींवर काम करतात

बॉलिवूडमध्ये काही दिवसांपासून कामाच्या तासांबद्दल वादविवाद सुरू आहेत. दीपिका पादुकोणने 'स्पिरिट' चित्रपटातून घेतलेल्या एक्झिटनंतर तर हा विषय प्रकर्षाने चर्चेत आला. संदीप रेड्डी वांगा यांच्या 'स्पिरिट' चित्रपटाचं शूटिंग सुरू होण्याआधी दिवसाला फक्त आठ तास काम करणार, अशी मागणी दीपिकानं ठेवली होती. त्यानंतर दोघांमध्ये त्यावर एकमत न झाल्यानं तिनं चित्रपटातून एक्झिट घेतली. अशातच आता मराठमोळी अभिनेत्री ईशा कोपिकर हिने याबद्दल तिची प्रतिक्रिया दिली आहे. ईशा म्हणाली, आमच्याकडे १२ तासांच्या शिफ्टची पद्धत आहे. जेव्हा तुम्ही कॉन्ट्रॅक्ट साइन करता तेव्हा याबद्दल चर्चा व्हायला हवी आणि जर निर्मात्यांना तेच कलाकार हवे असतील, तर मग त्यांनी त्या कलाकाराची मागणी पूर्ण करावी. जर मागणी पूर्ण करायची नसेल, तर तो कलाकार कलाकृतीतून बाहेर पडेल हे मान्य करावं. कारण तुम्हाला विशिष्ट कलाकारच हवा आहे आणि मग त्यानं तुमच्या मनाप्रमाणे काम करावं, अशी अपेक्षा तुम्ही ठेवू शकत नाही. हे चुकीचं आहे. जे कलाकार तुमच्या मागणीप्रमाणे काम करीत आहेत, त्यांच्याबरोबर तुम्ही काम करा आणि एखादा कलाकार तुमच्या मागणीनुसार काम करीत नसेल, तर त्यांना घेऊ नका. मला तर कळत नाहीये की, नेमकं अडतंय कुठे? ईशा कोपिकर पुढे तिला जर कामाची गरज असेल, तर ती १२ तास काय १६ तासही काम करू शकते, असं म्हटलं आहे. अभिनेत्री म्हणाली, जर तुम्ही आठ तास काम करणाऱ्या अभिनेत्रीला घेऊन, तिच्याकडून १६ तास काम करण्याची अपेक्षा ठेवत असाल आणि ती करीत नसेल, तर तुम्ही तिच्याबरोबर काम करू नका. दुसऱ्या कोणाबरोबर काम करा. त्यामुळे यात कलाकाराचा दोष नाहीये. ही निर्मात्यांची चूक आहे. तुम्हाला सुपरहिट हिरोइन, हीरो हवे असतील, तर मग सुपरहिट हीरो आणि हिरोईन त्यांच्या तत्त्वांनुसार काम करतात. ईशाने पुढे असे सांगितले, बरेच दिग्दर्शक आहेत, ज्यांनी त्यांच्या अटींवर काम न करणाऱ्या कलाकारांना काढून टाकलं आहे, असं म्हटलं आहे. ईशा पुढे म्हणाली, १० चित्रपट नाही मिळाले, तर आपोआप तुमच्या हिशोबानं काम करतील आणि जर तसं करीत नसतील, तर त्याचा अर्थ त्यांचं पोट भरलेलं आहे.



# 'ओ रोमिओ'साठी घेतले नाना पाटेकरांनी 'इतके' मानधन



बॉलिवूडमध्ये येत्या काळात अनेक सेलिब्रिटींचे चित्रपट प्रदर्शित होणार आहेत. यापैकीच एक म्हणजे शाहिद कपूर. शाहिद कपूर सध्या त्याच्या 'ओ रोमिओ' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. यामध्ये त्याच्यासह नाना पाटेकर, तमन्ना भाटिया यांसारखे अनेक कलाकार झळकणार आहेत. शाहिद कपूरच्या 'ओ रोमिओ'मध्ये तृप्ती डिमरी मुख्य अभिनेत्रीच्या भूमिकेतून झळकणार आहे. यामधून पहिल्यांदाच शाहिद व तृप्ती एकत्र काम करत आहेत, त्यामुळे या चित्रपटातील या फ्रेश जोडीची ऑनस्क्रीन केमिस्ट्री कशी असेल याबाबतही प्रेक्षकांमध्ये उत्सुकता आहे. शाहिद व तृप्ती यांच्याबरोबर नाना पाटेकर, तमन्ना भाटिया, फरीदा जलाल यांसारखे इतरही काही कलाकार महत्त्वपूर्ण भूमिकेतून झळकणार आहेत. पण, तुम्हाला माहीत आहे का या चित्रपटासाठी या सेलिब्रिटींनी किती मानधन घेतले आहे? विशाल भारद्वाज दिग्दर्शित शाहिद कपूर व तृप्ती डिमरी यांच्या मुख्य भूमिका असलेला 'ओ रोमिओ' हा चित्रपट येत्या १३ फेब्रुवारीला चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. चित्रपटात मुख्य भूमिकेत असलेल्या शाहिदने 'फ्री प्रेस जरनल'च्या वृत्तानुसार ४५ कोटी रुपये इतकं मानधन घेतलं आहे. तो या चित्रपटामध्ये उस्तारा हे पात्र साकारत आहे. शाहिद चित्रपटातील सर्वाधिक मानधन घेणारा अभिनेता आहे, तर त्याच्यासह मुख्य भूमिकेत असलेल्या आणि चित्रपटात अफशा ही भूमिका साकारणाऱ्या तृप्ती डिमरीने उल्लेख केलेल्या माध्यमाच्या वृतानुसार ६ कोटी इतकं मानधन घेतल्याचं म्हटलं जात आहे. चित्रपटात खलनायकाची भूमिका साकारणारा अभिनेता अविनाश तिवारी यांने चित्रपटातील नायिका तृप्ती डिमरीपेक्षाही अधिक मानधन घेतल्याचं म्हटलं जातंय. उल्लेख केलेल्या माध्यमाच्या वृत्तानुसार अभिनेत्याने ७ कोटी इतकं मानधन घेतलं आहे; तर चित्रपटात रबिया ही भूमिका साकारणारी अभिनेत्री तमन्ना भाटिया हिनेसुद्धा ७ कोटी इतकं मानधन घेतलं असल्याचं म्हटलं जातंय. तृप्ती व तमन्नासह 'ओ रोमिओ'मध्ये दिशा पाटणीसुद्धा झळकणार आहे. ती यामध्ये डान्सरच्या भूमिकेतून पाहायला मिळणार आहे, यासाठी तिने २ कोटी रुपये इतकं मानधन घेतल्याचं म्हटलं जातंय. चित्रपटात नाना पाटेकरसुद्धा महत्त्वपूर्ण भूमिकेतून पाहायला मिळणार आहेत. यामध्ये ते इस्माईल खान ही भूमिका साकारत असून वृत्तानुसार यासाठी त्यांनी ४ कोटी इतकं मानधन घेतल्याचं म्हटलं जातंय. यासह सिनेमात विक्रांत मेस्सीसुद्धा महत्वपूर्ण भूमिकेतून झळकणार आहे. अद्याप विक्रांत मेस्सी व फरीदा जलाल यांनी किती मानधन घेतलं आहे याबद्दलची माहिती समोर आलेली नाही.